## तरूणांनो, विचार कराल तर....

**प्रकाशक व मुद्रक**
अलका जोशी, १२९ बी/२, लोकायत, सिंडीकेट बॅंकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉप जवळ, पुणे-४

**मुद्रणस्थळ**
आर. एस. प्रिंटर्स, ४५५, शनिवार पेठ, पुणे -३०

**पुनर्मुद्रण**: नोव्हेंबर २०१३

**कॉपीराईट नाही**

**प्रस्तावित सहयोग मूल्य रु. ५/-**

## आमची इतर काही प्रकाशने

| | |
|---|---|
| ये दिल मांगे मौत (कोक-पेप्सी भारत छोडो) | रु. ५/- |
| देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे | रु. ५/- |
| डाऊ हटवा पुणे वाचवा | रु. ५/- |
| मी नास्तिक का आहेः शहीद भगतसिंग | रु. ५/- |
| आरशातील राक्षस: अरुंधती रॉयचे तीन लेख | रु. १०/- |
| लढा वॉलमार्टशी | रु. १०/- |
| तुम्ही बेकार का ? | रु. १५/- |
| शहीद भगतसिंगाचे तरूणांना आवाहन | रु. १५/- |
| शिक्षणाची राखरांगोळी | रु. १५/- |
| इरादे कर बुलंद | रु. १५/- |
| भारत पुन्हा गुलामीकडे | रु. २०/- |
| आण्विक वेडेपणा | रु. २०/- |
| उठ माणसा: गाणी संघर्षाची | रु. ३०/- |
| जागतिकीकरण की नवी गुलामगिरी | रु.१५०/- |
| Kick Out Dow, Save Pune | Rs. 5/- |
| Unite to Reclaim the Judiciary | Rs. 7/- |
| Resist the Silent Emergency | Rs. 10/- |
| Fight FDI in retail | Rs. 10/- |
| Palestine, Israel and the Arab-Israeli Conflict | Rs. 10/- |
| The Crisis of Global Warming | Rs . 15/- |
| Yeh Dil Mange Maut! Coke-Pepsi Quit India! | Rs . 15/- |
| India Becoming a Colony Again | Rs. 20/- |
| Unite, to Fight Nuclear Madness! | Rs. 20/- |
| Globalisation or Recolonisation? | Rs. 150/- |
| Nuclear Energy: Technology From Hell | Rs. 295/- |

## दोन शब्द

'तरुणांशी हितगुज' ही पुस्तिका सुमारे शतकभरापूर्वी रशियात झारशाही विरोधात लढणाऱ्या एका क्रांतिकारकाने लिहिली होती. स्वत: नात्याने राजघराण्याशी जोडलेला असूनही हुकूमशाहीच्या विरोधात जनतेच्याबाजूने उभ्या राहिलेल्या या क्रांतिकारकाची, 'प्रिन्स क्रोपोतकिन'ची ही पुस्तिका तरुणांमध्ये वणव्यासारखी पसरत गेली. आपल्या देशासाठी काही करण्याचे स्वप्न पाहाणाऱ्या असंख्य तरुणांची ती मार्गदर्शक बनली. १०० वर्षांपूर्वीची ही पुस्तिका आजही तितकीच महत्त्वाची वाटते. आज आपल्याही देशात असंख्य प्रश्नांचे भस्मासुर आपल्यापुढे आ वासून उभे आहेत. त्यातला जो प्रश्न महत्त्वाचा वाटतो, त्याच्यावर उत्तर शोधायचा आपल्यातले अनेक जण प्रयत्न करत आहेत. भ्रष्टाचारविरोधी लढा, स्वदेशी किंवा अगदीच काही नाही तर प्रत्येकाने आपापले काम प्रामाणिकपणे केल्यानेच देशापुढच्या अनेक समस्यांचे उत्तर मिळेल असे खूप लोकांना, विशेषत: तरुणांना वाटते.

आज अनेक तरुण-तरुणी या मार्गाने देशासाठी काही करण्याचे स्वप्न पाहात आहेत. छोटी-छोटी समाजोपयोगी कामे करून हळूहळू सगळ्या देशाला सुस्थितीत नेता येईल, अशी आशा काहींना वाटते तर काहींना सॉफ्टवेअरमधील क्रांती भारताला जगातील आर्थिक महासत्ता बनवेल असे वाटते. देशाच्या प्रगतीला एकमेव अडथळा आहे, तो राजकारणी आणि त्यांच्या भ्रष्टाचाराचा असे मानून त्या विरोधात लढा उभारणे किंवा निर्भीड पत्रकारितेच्या माध्यमातून सत्य उघडे पाडणे असा काहींचा प्रयत्न असतो. या भावनांमागील जी तळमळ आहे, ती अभिमानास्पद आहे. देशाचे भवितव्य नवयुवकांच्या हातात आहे, तेच या धरतीचे सुपुत्र आहेत. दु:ख सहन करण्याची त्यांची तयारी, त्यांचा पराक्रम आणि असीम त्याग हेच दाखवतात, की भारताचे भविष्य त्यांच्या हातात सुरक्षित आहे, हा भगतसिंगांचा विश्वास यथार्थच आहे. पण ही भावना, एकेकट्या हृदयात तेवत राहिली तर तिचा काहीच उपयोग नाही. आज साम्राज्यशाही अक्राळविक्राळ स्वरूपात जगाच्या कानाकोपऱ्यात भयानक तांडव करत आहे. भारतातले राज्यकर्तेही या मुजोर साम्राज्यशाहीला विरोध न करता उलट त्यांचे साथीदार बनले आहेत.

कसले शिक्षण घ्यायचे, त्यासाठीची प्रचंड फी कुठून भरायची, आणि एवढे करून पुढे उभ्या ठाकणाऱ्या बेकारीच्या भस्मासुराला कसे तोंड द्यायचे या प्रश्नांनी गांजलेल्या आजच्या तरुणाईला, हे सगळेच प्रश्न जागतिकीकरणाच्या भयानक तांडवातूनच निर्माण झाले आहेत हे समजून घ्यावे लागेल. त्यानंतरच आपल्या हेही लक्षात येईल, की हातात हात मिळवून, हजारोंच्या संख्येने एकत्र येऊन, आपल्या हृदयातल्या ज्योतींचे रुपांतर एका प्रचंड वणव्यात करूनच या साऱ्या प्रश्नांशी मुकाबला करता येऊ शकतो.

हा लढा सोपा नाही हे खरेच, पण तो एवढा अवघड झालाय तोही, आपण फक्त स्वत:पुरताच विचार करतोय म्हणूनच! आपण एकेकटे आपापल्या ठिकाणी लढायचा प्रयत्न करतो आणि मग अन्याय करणाऱ्यांना आपल्याला चिरडणेही सोपे जाते; पण आज जगभरातल्या शोषित जनतेच्या हे लक्षात यायला लागलय. प्रिन्स क्रोपोतकिन आणि भगतसिंगसारख्या क्रांतिकारकांनी चेतवलेली अग्नी जगभर ठिकठिकाणी उफाळून येऊ लागलीय. शोषकांविरुद्ध, साम्राज्यशहांविरुद्ध जनता हिमतीने उभी राहातीये. तरुण तरुणींनो या लढ्यातले सैनिक म्हणून अभिमानाने उभे राहाल तर पुस्तिकेचा हा भावानुवाद यशस्वी झाला असे म्हणता येईल.



**माझ्या तरुण मित्र मैत्रिणींनो,**

मला आज तुमच्याशी थोडेसे बोलायचे आहे. हो तरुणांशीच! ज्यांची मनं आणि बुद्धी म्हातारी झाली आहे. अशांनी वाचण्याचे कष्ट घेऊ नयेत. उगाच डोळे दुखतील, मिळणार काहीच नाही.

दोस्ता, मी असे समजतो की तू १८-२० वर्षांचा तरूण आहेस, शिक्षण संपवून बाहेरच्या दुनियेत पाऊल टाकायला उत्सुक! आजवर तुझ्या डोक्यात तुझ्या शिक्षकांनी भलभलत्या अंधश्रद्धा घुसवण्याचा प्रयत्न केला असला तरीही तू त्यापासून मुक्त आहेस असे मी मानतो. स्वर्ग-नरक असल्या गोष्टींना तू भीत नाहीस आणि मुल्ला-मौलवी किंवा भट-पुजाऱ्यांच्या भुलथापांकडे तू दुर्लक्ष करतोस, हे ही मी मानतो. दांभिकपणे वागणाऱ्या आणि दिखाऊपणात धन्यता मानणाऱ्या, चकचकीत कपडे घालून माकडांसारखे चेहरे रंगवून नाचणाऱ्या आणि प्रत्येक गोष्टीचा उपभोग घेण्याचा हावरेपणा करणाऱ्या वर्गातही तू मोडत नाहीस. तू एक सहृदय व्यक्ती आहेस आणि म्हणूनच मला तुझ्याशी बोलायचे आहे.

आज तुझ्यासमोर एक मोठ्ठा प्रश्न आहे, 'मला पुढे काय करायचे आहे?' खरेतर तरूणपणी सगळ्यांनाच वाटते की ज्या समाजाच्या मदतीने त्याने शिक्षण घेतले, त्या समाजाला स्वत:च्या स्वार्थाकरता लुटण्यासाठी त्या शिक्षणाचा उपयोग करणे चुकीचे आहे. केवळ महाभ्रष्ट आणि दृष्ट-दुर्गणी व्यक्ती सोडल्या तर इतर सर्वांच्याच मनात एकच विचार असतो, तो म्हणजे, वेळ येईल तेव्हा मी माझ्या बुद्धीमत्तेचा, क्षमतांचा आणि ज्ञानाचा उपयोग आज गरिबीत खितपत पडलेल्या माझ्या बांधवांसाठीच करेन. तुझ्याही मनात असेल विचार, अशीच स्वप्ने असतील. हो ना? तर मग ही स्वप्ने साकार करण्यासाठी तुला काय करावे लागेल याचा आपण विचार करू. तुझी सर्व परिस्थिती मला माहीत नाही. कदाचित तू संपन्न घरातला तरूण/तरूणी असशील आणि डॉक्टर, इंजिनिअर किंवा शास्त्रज्ञ बनण्याची तुझी मनिषा असेल. किंवा कदाचित तू कष्टकरी घरातला जगण्यासाठी धडपड करणारा तरूण असशील आणि कष्टाचे यथायोग्य फळ मिळावे एवढेच तुझे स्वप्न असेल. दोन्हीही प्रकाराच्या तरूणांशी मला बोलायचे आहे.

### डॉक्टर जनतेच्या सेवेसाठी, की......?

आधी मी पहिली शक्यता गृहीत धरतो. समजू की तुला डॉक्टर व्हायचे आहे. डॉक्टर होऊन तू प्रामाणिकपणे तुझा व्यवसाय सुरु करशील आणि पुढे....?

एक चित्र डोळ्यापुढे आण.... फाटके कपडे घातलेला एक माणूस त्याच्या बायकोला तपासण्यासाठी तुला बोलवायला येतो. एक अत्यंत अरुंद, गलिच्छ बोळातून, दुर्गंधीला सरावत, घाणेरड्या गटारांवरून उड्या मारत बकाल झोपडपट्टीतल्या त्याच्या घरी तुम्ही जाता. जगते का मरते अशा अवस्थेतील एक

बाई तिथे क्षीणपणे पडलेली असते. हातापायाच्या काड्या झालेली पोरे तुझ्याकडे डोळे फाडून पाहात असतात. त्या बाईचा नवरा मिळेल तिथे रोजंदारीवर काम करतो. पण गेले तीन महिने त्याला काम नाही. ही बाईच धुण्याभांड्याची कामे करून घर तगवत होती. पण गेल्या दोन महिन्यांपासून तीही आजारी आहे. आणि त्यामुळे सगळ्या घराचीच अशी दुर्दशा झाली आहे. डॉक्टरसाहेब, तुम्हाला तर आल्याआल्याच कळले असेल की निव्वळ अशक्तपणा एवढाच या बाईचा रोग आहे आणि त्याचे कारण आहे पौष्टिक अन्नाचा आणि शुद्ध हवेचा अभाव! आता त्यासाठी तुम्ही काय औषधे देणार? काय उपाय सुचविणार? रोज एक लिटर दूध? गावाबाहेर मोकळ्या हवेत फिरायला जाणे? चांगल्या हवेशीर खोलीत झोपणे? हे उपाय तुम्हाला हास्यास्पद नाही वाटत? अहो, या सगळ्या गोष्टी करण्याची जर तिची परिस्थिती असती तर तिच्यावर ही वेळ कशाला बरे आली असती ?

तुझ्या चेहऱ्यावरचा कनवाळूपणा, प्रामाणिकपणा पाहून ते लोक तुझ्याशी मोकळेपणाने बोलू लागतील. आणि मग तुला आणखीही बऱ्याच गोष्टी समजतील. बाजूच्या झोपडीत कुणीतरी असह्य खोकत आहे. ती एक गरीब धोबीण आहे. ऊर फुटेस्तोवर काम करून तिला हा आजार जडलाय. त्याच्या पलिकडच्या झोपडीतील सगळीच्या सगळी मुले कसल्याशा तापाने आजारी आहेत. पण एकदम सगळ्यांना औषधपाणी करायला त्यांच्याबापाकडे पैसा नाही.

या सगळ्या आजारी लोकांना तू काय सांगशील? त्यांच्यासाठी पौष्टिक अन्न, हवा बदल, हलका व्यायाम इ. ची सोय करशील? तुझी खूप इच्छा असेल तसे करावे अशी. पण हे करणे तर दूरच, तू त्यांना तसे म्हणूही शकत नाहीस. खिन्न मनाने नशिबाला दोष देत तू परत येतोस.

नरकयातना भोगणाऱ्या लोकांचा विचार तुझ्या डोक्यातून सहजासहजी जात नाही. त्यावेळी तुझा एक मित्र तुला त्याचा अनुभव सांगतो. काल त्याच्याकडे एकजण गाडी घेऊन आला होता. शहरातल्या सगळ्यात श्रीमंत वस्तीत राहाणाऱ्या त्याच्या मालकिणीला तपासायला नेण्यासाठी! बाईसाहेबांना निद्रानाशाचा विकार आहे. तिने आपले सगळे आयुष्य नटण्या-मुरडण्यात, मेजवान्या झोडण्यात, पत्ते खेळण्यात आणि आपल्या मख्ख नवऱ्याबरोबर ऐय्याशी करण्यात घालवले आहे. तुझ्या मित्राने तिला निद्रानाशावरचे उपाय सुचवले - शक्य तितक्या कृत्रिम सवयींचा त्याग करणे, साधे जेवण, स्वच्छ हवेत फिरणे, मन शांत राखणे आणि काहीच शारीरिक कष्ट नसल्याने किमान खोलीतल्या खोलीत हलका व्यायाम करणे.

आयुष्यात कधीच पुरेसे अन्न आणि आराम न मिळाल्याने एक मरते आहे आणि दुसरीला शारीरिक कष्ट काय ते माहितच नसल्याने त्रास होत आहे.



अशा वेळी परिस्थितीमुळे पराभव पत्करून एक उसासा सोडून तू याकडे दुर्लक्ष केलेस, मग अशा दृश्यांची तुला हळूहळू सवय होऊन जाईल. एवढेच नव्हे तर तू कोणत्याही परिस्थितीतून आपला फायदा कसा साधायचा हे शिकत जाशील. पण तू खरेच संवदेनाशील असशील, परिस्थितीपुढे शरण न जाता ती बदलण्याची तुझी इच्छा असेल, तर मग तुझा विवेक तुला सांगेल, नाही! हा अन्याय आहे. हे बदलले पाहिजे. आणि त्यासाठी केवळ आजारांवर उपाय करत राहण्यापेक्षा ते निर्माण होण्याची कारणे नष्ट केली पाहिजेत. सगळ्या माणसांना अन्न, वस्त्र आणि शिक्षण मिळाले तर त्याक्षणीच अर्धे रोग नाहीसे होतील. नवनव्या रोगांवर उपाय शोधणे राहू दे बाजूला, सर्व लोकांसाठी स्वच्छ हवा, पौष्टिक अन्न आणि पुरेसे शारीरिक श्रम या गोष्टी आधी हव्यात. त्या नसतील तर वैद्यकीय शास्त्रातील कित्येक गोष्टी म्हणजे निव्वळ गप्पा आहे.

बस्, ज्या दिवशी ही गोष्ट तुझ्या ध्यानात येईल तेव्हा तू एका नव्या जगाची स्वप्ने पाहू लागशील आणि ती साकार करण्यासाठी काय करावे लागेल याचा विचारही करू लागशील. आजची सामाजिक परिस्थिती काय आहे, ती बदलायला काय करावे लागेल याचा जे विचार करतात, त्यासाठी प्रयत्न करतात, त्यांच्यामध्ये तुही सामील होशील.

**वैज्ञानिक व्हायचं ठरवलंत तर....?**

तुमच्यापैकी कोणी असे म्हणेल की असल्या व्यवहारी धंद्याशी मी मुळी संबंधच ठेवनार नाही. मी शास्त्रज्ञ होईन खगोलशास्त्र, जीव-भौतिक-रसायनशास्त्रामध्ये संशोधन करीन. त्या कामाचे फळ तर नेहमी चांगलेच असेल. भले ते मग पुढच्या पिढीला का मिळेना!

बरे, तर सर्वात आधी आपण हे समजून घेऊ की विज्ञानाच्या प्रगतीतून तुला स्वत:ला काय हवे आहे? तुझा उद्देश निव्वळ आनंद मिळवणे हा आहे का? निसर्ग निरीक्षणातून अथवा आपल्या बौद्धिक क्षमता पणाला लावून एखादे काम करण्यातून जसा आनंद मिळतो तसा? तसे असेल तर मग माझा प्रश्न असा आहे की, आपले जीवन आनंदात घालवण्यासाठी विज्ञानाचा अभ्यास करणारा तुझ्यासारखा वैज्ञानिक आणि घटकाभर आनंदाने विहरायला मिळावे यासाठी दारूच्या नशेत राहणारा दारूडा यात काय फरक आहे? वैज्ञानिकाने आपल्या आनंदाचे साधन अधिक हुशारीने निवडले आहे आणि त्यातून मिळणारा आनंद अधिक समृद्ध आणि टिकाऊ असेल कदाचित! पण तरीही दोन्हीची जातकुळी एकच नाही का? दोघेही स्वत:चा स्वार्थच तर पाहातात. दोघांचाही उद्देश एकच - वैयक्तीक सुख मिळवणे!

तू कदाचित म्हणशील की मी माझ्या स्वार्थासाठी नव्हे तर विज्ञानाच्या प्रगतीचा मानवजातीच्या कल्याणासाठी उपयोग होईल म्हणून काम करेन. माझ्या साऱ्या संशोधनाचाही हाच उद्देश असेल.

खरे सांगू? हा एक मजेशीर भ्रम आहे. आपल्यापैकी सगळेच जण विज्ञानाचा अभ्यास करताना हाच विचार करतात. पण थोडा अधिक विचार केला की त्यातला फोलपणा लक्षात येतो.

संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी विज्ञानाने काय केले पाहिजे, आणि आजवर काय केले आहे असा विचार तू करायला लागशील तर लगेचच तुझ्या लक्षात काही गोष्टी येतील. आजच्या समाजात विज्ञान हे निरनिराळ्या सुखोपभोगासाठी वेठीला धरले जात आहे – आणि तेही मूठभर श्रीमंतांकडून. बाकी बहुसंख्य लोकांच्या आयुष्यात विज्ञानाच्या या इतक्या प्रगतीनंतरही फरक पडलेला नाही. एकच उदाहरण देतो. विश्वाची उत्पत्ती कशी झाली याच्याबद्दल आधुनिक विज्ञानाने कितीतरी संशोधन केले आहे. पण तरीही असंख्य लोकांच्या डोक्यातल्या खुळ्या अंधश्रद्धा अजूनही जशाच्या तशाच नाहीत का? विश्वाची उत्पत्ती जाणणाऱ्या लोकांची संख्या या कोट्यावधी लोकांच्या तुलनेत नगण्यच म्हणायला हवी.

थोडा आणखी विचार करू. एक साधं उदाहरण घेऊ. शरीर आणि आरोग्यशास्त्राची इतकी प्रगती होऊनही किती लोकांपर्यंत ते ज्ञान पोहोचले आहे? किंवा त्या ज्ञानाचे फायदे किती लोकांना झालेत? शरीर निरोगी राहण्यासाठी काय केले पाहिजे हे विज्ञानाने सांगितले. पण पुढे काय? प्रत्येकाला जर त्या गोष्टी करता आल्या तर सगळ्या जनतेचे आरोग्य सुधारेल. पण हे नुसते माहीत असून उपयोग काय? तर शून्य. निरोगी जीवन जगण्यासाठी आवश्यक ती काळजी घेणे प्रत्येकाला शक्यच नाही आणि त्यामुळेच आज विज्ञानाचे अस्तित्व मूठभर लोकांपुरतेच आहे. समाज आज दोन विभागांमध्ये विभागला गेला आहे. कष्टकरी आणि श्रीमंत भांडवलदार. या दोन्ही मधील फरकामुळे कसे जगावे हे सांगणाऱ्या साऱ्या शास्त्रांचा अर्थ शंभरातल्या नव्वद जणांसाठी केवळ एक क्रूर चेष्टा आहे.

मी तुला आणखीही अनेक उदाहरणे सांगू शकतो. पण त्याच त्या गोष्टींची चर्चा करण्यात काही अर्थ नाही. त्यापेक्षा तूच पुस्तकात खुपसलेले डोके बाहेर काढून जगाकडे पाहा. माझ्या म्हणण्याला पुष्टी देणारे असंख्य पुरावे तुलाही सापडतील.

आत्ता या क्षणी विज्ञानाच्या अभ्यासात असे खोल बुडून जाण्याने काय साध्य होणार आहे? आजवर जे ज्ञान मिळालेले आहे त्याचा सर्वसामान्यांना कसा उपयोग होईल यावर विचार करणे त्याहून जास्त गरजेचे नाही का? प्रत्येक माणूस



विज्ञानाचे सिद्धांत समजून घेऊन आपल्या आयुष्यात त्याचा वापर करू शकेल हे आपले साध्य आहे. तसे होईल तेव्हाच विज्ञान हा छंद न बनता, माणसाच्या जीवनाचा आधार बनेल. तसे होणे हेच न्यायाचे आहे.

आणि खरे तर विज्ञानाच्या प्रगतीसाठीही तेच आवश्यक आहे. विज्ञानाची खरी प्रगती तेव्हाच होते जेव्हा सारा समाज त्यांचे स्वागत करतो. यांत्रिक ऊर्जेचा सिद्धांत १८ व्या शतकात मांडला गेला. पण तो ८० वर्षे पुस्तकातच बंद होता. भौतिक शास्त्राच्या ज्ञानाचा जनतेमध्ये प्रसार झाल्यानंतरच त्या सिद्धांताचा उपयोग होऊ शकला. डार्विनने प्राण्यांच्या उत्क्रांतीचा सिद्धांत मांडल्यानंतर त्याचा समाजात स्वीकार होण्यासाठी तीन पिढ्या जाव्या लागल्या! कवी आणि चित्रकारांसारखाच वैज्ञानिकाच्या अस्तित्वाचा आधारही समाजच आहे. शेवटी वैज्ञानिक हा समाजाचाच भाग आहे आणि तिथेच त्याला आपल्या सिद्धांताचा प्रचार करायचा आहे.

पण जेव्हा तुझ्या हे लक्षात येईल, तेव्हा त्याबरोबरच हेही लक्षात येईल की आजच्या परिस्थितीमध्ये मूलभूत बदल घडवून आणणे सर्वात महत्त्वाचे आहे. केवळ थोड्या वैज्ञानिकांमध्ये विज्ञानाचे सगळे ज्ञान आज एकवटलेले आहे आणि बाकी जनता मात्र हजारो वर्षांपासून चालत आलेल्या गुलामीत खितपत पडली आहे. ही स्थिती बदलायला नको का? ज्या दिवशी तुला या गंभीर वैज्ञानिक सत्याचे ज्ञान होईल त्या दिवसापासून तुला केवळ वैज्ञानिक संशोधनात मजा वाटणार नाही. तू असा बदल घडविण्यासाठीच्या उपायांचा शोध घ्यायला लागशील आणि हा शोधही तू इतर वैज्ञानिक शोधांसारखा नि:पक्षपणे आणि खरेपणाने घेशील तर तुला अनेक नवनवीन सत्ये लक्षात येतील. ज्यांच्याजवळ सुखोपभोगांच्या साधनांची रेलचेल आहे, त्यांच्यासाठी आणखी तशीच साधने शोधून काढण्याऐवजी तू आपल्या ज्ञानाचा उपयोग अत्याचाराने ग्रासलेल्यांच्या सेवेसाठी करशील.

विश्वास ठेव की तुझे विचार आणि प्रत्यक्ष काम यामधील एकता जेव्हा वाढेल तेव्हा खरोखर तुझ्यामध्ये किती अपरिमित क्षमता आहे हेही तुझ्या लक्षात येईल. या क्षमतांचे अस्तित्त्वही आजवर तुला जाणवले नसेल. आणि शेवटी तो सुदिन उगवेल – अगदी नक्की उगवेल – ज्या दिवशी तुला हवा असलेला बदल घडून आला असेल. आणि मग त्यावेळी सर्वदूर परसलेल्या ज्ञानामुळे मिळालेली नवीन शक्ती घेऊन कष्टकरी जनतेच्या सहाय्याने विज्ञान आणि कलाकौशल्य हातात हात घालून इतकी प्रगती करतील की आजची त्यांची गती यापुढे अगदीच कूर्मगती भासेल आणि त्यावेळी तुला विज्ञानाचा खरा आनंद समजेल. कारण त्यावेळी त्या आनंदात तुझ्याबरोबर बाकी जनताही सहभागी झालेली असेल.

**वकील झाल्यावर ....?**

समजू की तू कायद्याची परिक्षा पास झाला आहेस आणि वकिली चालू करणार आहेस. तुझ्याही आपल्या भविष्याबद्दल काही कल्पना असतील. मी असे मानतो की तू एक सद्‌विचारी, परोपकारी तरूण आहेस. कदाचित तुझ्या मनात असेल, मी जीवनभर सर्व प्रकारच्या अन्यायांच्या कायद्याच्या साहाय्याने विरोध करत राहीन. जनतेसमोर कायद्याच्या राज्यांचा एक आदर्श प्रस्थापित करेन. यापेक्षा श्रेष्ठ काम दुसरे कोणते असेल? असा विचार करुन तू वकिलीच्या व्यवसायात कोठे आदर्श डोळ्यासमोर ठेऊन प्रवेश करतोस खरा. तर मग आता आपण कायद्यातील काही निकालाची पाने उघडून, तपासून पाहूया, की प्रत्यक्षात स्थिती काय आहे. एका गरीब आरोपीची केस कोर्टासमोर आहे. या आरोपीचे नातेवाईकही त्याच्यासारखेच गरीब आहेत. अशा आरोपीला जामीन मिळवणे कधीच शक्य नाही. कारण कायद्यानुसार जामीनदार राहाण्यासाठी संपत्ती, जमीनजुमला असणे आवश्यक आहे. कायद्यापुढे सर्व समान हे फक्त बोलण्यापुरतेच!

त्या उलट हे शेठजी बघ! शेअर मार्केटमध्ये त्यांनी असंख्य घोटाळे केलेत. अनेकांचे जीवन त्यांच्यामुळे उध्वस्त झाले आहे. मात्र हे शांतपणे उजळ माथ्याने सगळीकडे वावरत आहेत. न्यायालय ही यांच्यासाठी खिशात टाकण्याची आणखी एक संस्था आहे. अशा ठिकाणी कायद्याबद्दल तुला काय म्हणायचेय?

आणखी एक विचार करूया. कुठल्याशा कारखान्याच्या मालकाने अचानक काही कामगारांना कामावरून कमी केले. त्याच्या विरोधात कामगारांनी नोटीस न देता संप पुकारला. हा संप अर्थातच बेकायदेशिर ठरतो. आता अशा वेळी तू काय करशील? म्हणजे कुणाची बाजू घेशील? ज्याने शक्य तेव्हा मिळेल त्या संधीचा फायदा घेऊन, कामगारांची पिळवणूक करून भरपूर पैसा कमावला आणि आता गरज नाही तेव्हा अचानक त्यांना कामावरून कमी केले; की, त्या कामगारांची, जे आपल्या सहकाऱ्यांसाठी संपावर गेले? कामगारांना नोकरी शोधण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य आहे, अशा फुशारक्या मारणाऱ्या कामगार कराराच्या फसव्या कायद्याबद्दल तुझे काय मत आहे? तो करार कायदेशीर आणि त्यामुळे योग्य असल्याचे तुझे मत आहे का? की खरे तर एक जण संपत्तीत लोळणारा आणि दुसरा जगण्यासाठी धडपड करणारा, यांच्यातील करार हा करारच नव्हे असे तुला वाटते? अत्यंत असमान परिस्थितीतील दोन व्यक्तींमधील हा करार कायदेशीर असला तरी खऱ्या न्यायाच्या बाजूचा नाही, असे तुला वाटत नाही का?

हा आणखी एक खटला पाहा. एका गजबजलेल्या रस्त्यावरून फिरता फिरता एक माणूस एका दुकानातून गव्हाच्या पिठाची पिशवी घेऊन पळताना पकडला



गेला. चौकशीमध्ये त्याने सांगितले की तो एक चांगला मेकॅनिक आहे. मात्र बेकार! चार दिवसात मुलांना खायला मिळाले नाही म्हणून नाईलाजाने त्याने चोरी केली. दुकानदाराला चार लोकांनी सांगितले, दया दाखवून त्याला सोडून दे म्हणून, पण दुकानदाराला कायद्याचा जोश चढला होता! त्याने त्याला पोलिसांकडे सोपवले. आता पोलीस त्याला मरेस्तोवर मारतील. वर शिक्षाही होईल त्याला, कारण या आंधळ्या कायद्यात तसेच लिहिलेय. तू दररोज अशा प्रकारचे असंख्य खटले पाहतोस. तेव्हा तुझ्या मनात या समाजाबद्दल तिरस्काराची, विद्रोह करण्याची भावना निर्माण होत नाही का?

ज्याला लहानाचे मोठे करतानाच चोऱ्या-माऱ्या करायची सवय लावली गेली, ज्याने आयुष्याभरात सहानुभूतीचा एक शब्दही ऐकला नाही आणि शेवटी वाटमाऱ्या करता करता कुणाचातरी खुनही केला, त्याच्यावर कायद्याने काय कारवाई करायला हवी? फाशी की वीस वर्ष सक्त मजुरी? तुला माहीत आहे की तो एक मानसिक रुग्ण आहे आणि त्याच्या या स्थितीला अगदी पूर्णपणे आपला समाजच जबाबदार आहे.

हे विणकर, ज्यांनी मिल बंद होऊन उपाशी मरायची वेळ आली तेव्हा अत्यंत निराश होईन मिललाच आग लावली. हे विद्यार्थी, वाढवलेली फी भरता येत नाही म्हणून आत्मदहन करायला निघाले होते. आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे त्यांच्यावर! यांना कायद्याने शिक्षा होईलच. पण तुला काय वाटते त्यांच्याबद्दल?

तू जर शाळा कॉलेजात शिकवलेल्या गोष्टी पढतमूर्खाप्रमाणे बडबडत बसण्याऐवजी आपली अक्कल चालवशील, कायद्याचे विश्लेषण, चिकित्सा करशील आणि कायद्याचे खरे स्वरूप लपवून ठेवणाऱ्या भूलभुलैय्याला बाजूला करशील, तर तुला समजेल तथाकथित कायदा कुणाच्या फायद्यासाठी आहे ते! कायद्याचे खरे काम इथे आहे. ते म्हणजे बलवंतांच्या अधिकारांचे रक्षण करणे. या कायद्यांच्या मुळातला अर्थ आहे तो म्हणजे माणसाच्या इतिहासात जागोजागी दिसणाऱ्या रक्तलांच्छित अत्याचारांचे समर्थन. तू जर हा अर्थ समजून घेतलास तर तुझ्याही मनात कायद्यांचा विरोध जागा होईल. तुझ्या जीवनातील ही विसंगती फार काल कायम राहू शकणार नाही. शेवटी तू आपल्या अंतरात्म्याला चूप करून स्वत:च धूर्त आणि लबाड बनशील किंवा परंपरागत चालत आलेल्या या अन्यायाच्या विरोधात सर्व प्रकारच्या आर्थिक आणि राजकीय अन्यायांचा पूर्णपणे नाश करण्यासाठी आमच्याबरोबर कामाला लागशील आणि मग तुझीही गणना समाज बदलणाऱ्या क्रांतिकारकांमध्ये होईल.

## इंजिनिअर : प्रगतिचे पाईक ....?

तू नुकताच इंजिनिअरिंगचे शिक्षण घेऊन बाहेर पडला आहे आणि तुझ्या तंत्रकौशल्याचा उपयोग प्रत्यक्ष जीवनामध्ये करून कष्टकरी जनतेची परिस्थिती सुधारण्याचे स्वप्न पाहात आहेस. खरे सांगू, तुला बरेच धक्के बसतील आणि लवकरच तुझा भ्रम दूर होईल. समज, की दुर्गम, डोंगराळ भागात रस्ते बांधण्याच्या एका कामावर तुला नोकरी मिळते. उत्साहाने तुझ्या क्षमता आणि मेहनत यांचा पुरेपूर उपयोग करून तू कामाला सुरुवात करतोस. या आव्हानात्मक कामात तुझा सहभाग असल्याचा तुला खूपच आनंद आणि अभिमान वाटतो. पण जेव्हा काम सुरु होते तेव्हा तुला दिसते की अशा दुर्गम ठिकाणी काम करण्यासाठी बाहेरून जे मजूर आणले गेले आहेत, त्यांचे अतोनात हाल होत आहेत. त्यांची ना धड राहाण्याची सोय आहे, ना खाण्यापिण्याची. उन्हातान्हात, पावसात राबताना त्यांच्यापैकी कित्येकजण आजारी पडतात, त्यांच्याकडेही कुणाचे लक्ष नाही हे पाहून तुझ्या स्वप्नातील काम मिळाल्याचा तुझा आनंद कुठल्याकुठे विरून जातो.

ते काम करताना तुला दुर्गम भागात राहणारे आदिवासी भेटतात. त्यांच्यापर्यंत आजवर कुठल्याच सुविधा पोहचलेल्या नसतात. ना वीज, ना पाणी, ना रस्ते. तुला बरे वाटते की तुझ्या कामाचा निदान त्यांना तरी उपयोग होईल. पण छे! तुला नंतर कळते, की ते रस्ते त्या आदिवासींच्या भल्यासाठी नव्हे तर त्यांना तिथून हुसकवून लावण्यासाठी उपयोगात आणले जात आहेत. त्याच भागात होणाऱ्या धरणासाठी हे रस्ते बांधले जात आहेत. ज्यामुळे हे सारे आदिवासी विस्थापित होणार आहेत, भिकेला लागणार आहेत.

दुसरे उदाहरण पाहा. तू रात्रंदिवस डोके लढवून एक असे यंत्र शोधून काढतोस, ज्याने कुठलेसे एक उत्पादन सहजपणे करता येईल. तू तयार केलेले यंत्र कारखानदार उत्साहाने विकत घेतात. का? कारण त्यांच्या कारखान्यातील १५०-२०० कामगार त्यांना त्यामुळे कमी करता येणार असतात. या कामगारांची कुटुंबे देशोधडीला लागतात. कंपनीच्या त्या वर्षीच्या नफ्यात मात्र घसघशीत वाढ झालेली असते. हेच तुझे लक्ष्य होते का?

अशाच प्रकारे आजकालच्या इतर तंत्रज्ञानाबद्दल विचार करून पहा. मोठ्या प्रमाणात कपडे शिवू शकणाऱ्या यंत्रामुळे शिवणकाम करणाऱ्या महिलांचा काय फायदा झाला? माहिती व तंत्रज्ञानात एवढी प्रगती झाली, पण पोस्टमनची पायपीट कमी करण्यासाठी काही उपाय केले नाही कुणी! एखाद्या तांत्रिक सामाजिक प्रश्नाबद्दलही कोणताही पूर्वग्रह न ठेवता तर्कशुद्ध विचार करशील तर तूही हाच निष्कर्ष काढशील, की दुनियेमध्ये जोपर्यंत पैसा हाच केंद्रबिंदू आहे, तोपर्यंत प्रत्येक नवा शोध कामगारांचे, कष्टकऱ्यांचे कष्ट कमी करण्याऐवजी त्यांची गुलामी



आणखी मजबूत करतो; त्यांच्या कामाची स्थिती आणखी खालावते, मंदीचे संकट आणखी वारंवार येते आणि त्यामुळे फक्त आधीच धनिक असणाऱ्यांकडे आणखी संपत्ती एकवटत जाते.

तुझ्या विचारांचा हा निष्कर्ष निघेल तेव्हा तू काय करशील? एक तर खोटे तर्क देऊन आपल्याच अंतरात्म्याला गप्प बसवू पाहाशील आणि आपल्या स्वप्नांना तिलांजली देऊन आपल्या ऐषोआरामाची काळजी करण्यात गर्क होशील. गरिबांना लुटणाऱ्या दानवांमध्ये तूही सामील होशील. पण तुझ्या हृदयातील करुणा जागी असेल तर मात्र तू मनात म्हणशील नाही, ही वेळ नवनवी तंत्रे विकसित करण्याची नाही. पहिल्यांदा आपल्याला आहे त्या तंत्रज्ञानाचा उपयोग सर्वांसाठी कसा होईल याचा विचार करून त्या दृष्टीने समाजव्यवस्थेत बदल घडवून आणावा लागेल. जेव्हा उत्पादनाच्या आणि संपत्तीच्या विनिमयामध्ये समानता असेल तेव्हाच तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संपूर्ण मानवजातीचा फायदा होईल. त्याचवेळी, आज यंत्रासारखे जेवढ्यास तेवढे काम करणारेही उत्साहाने, स्वत: पुढाकार घेऊन, विचार करून काम करतील आणि मग नंतरच्या पन्नास वर्षात तांत्रिक कौशल्याची इतकी प्रगती होईल, ज्याची आपण आज कल्पनाही करू शकत नाही.

## शिक्षक - नव्या पिढीचे शिल्पकार....

आता राहिले शाळेचे शिक्षक, त्यांना काय बरे सांगू? अर्थातच मी पाट्या टाकणाऱ्या शिक्षकांबद्दल बोलत नाही. ज्यांचे मन लहान मुलांच्या हसण्याने प्रसन्न होते, त्या शिक्षकांशी मला बोलायचे आहे. असे शिक्षक, जे आपल्या मनातल्या ध्येयाची बिजे आपल्या विद्यार्थ्यांच्या मनात रुजवण्याची मनिषा बाळगतात!

गुरुजी, तुम्ही मला बऱ्याचदा चिंताग्रस्त दिसता. आणि खरे तर मला चिंतेचे कारणही माहित आहे. तुमच्या वर्गातील तो हुशार पोरगा, तुमचा आवडता विद्यार्थी, भगतसिंगाची गोष्ट मोठ्या आवेशाने ज्याने सांगितली, तो पोरगा तुम्हाला फार आवडतो कारण तो मनाने फार चांगला आहे आणि असे वाटत होते की आत्ता या क्षणी तो सगळ्या अत्याचारांचा खातमा करण्याच्या पवित्र्यात आहे.

पण तो विद्यार्थी जेव्हा घरी गेला तेव्हा त्याच्या आई-बापाने, काकाने त्याला झापले. कारण काय तर कुण्या बड्या अधिकाऱ्याच्या घरचे काम करायला तो गेला नाही. त्याला त्यांनी व्यवहार, आपली पायरी न सोडता वागणे, बड्या लोकांचे महत्त्व वगैरेंबद्दल एक मोठ्ठ भाषण ऐकवले. शेवटी त्या बापड्याने भगतसिंगाची कहाणी ठेवली बाजूला आणि जगात स्वत:ची प्रगती करून घेण्यासाठी गेला बिचारा त्या कलेक्टरच्या घरी राबायला.

तुमच्या बाकीच्या विद्यार्थ्यांचे तरी काय? कितीतरी जण गैरमार्गाला लागले आहेत. बरेच जण केवळ मोठे अधिकाऱ्याचे पद मिळवून इतरांवर सत्ता गाजवायची

स्वप्ने पाहात आहेत. ते जमले नाही तर अधिकाऱ्यांचे चमचे बनून गरिबांना लुटत आहेत. तुम्हाला या मुलांकडून किती आशा होत्या! आता मात्र तुमचे आदर्श आणि जगाची वास्तवता यातले अंतर पाहून तुम्ही चिंताक्रांत झाला आहात.

काही काळ तुम्ही अशी चिंता करत राहाल, पण मला वाटते थोड्याच दिवसात तुम्ही तुमचे सगळे आदर्श बासनात बांधून ठेवाल आणि सांगू लागाल ''भगतसिंग मोठा देशभक्त आणि स्वाभिमानी होता खरा, परंतु थोडा माथेफिरूच होता!'' तुम्ही विचार करायला लागाल, की दिवसभर पोरांना त्रैराशिक शिकवल्यानंतर आराम करताना वाचायला कविता ठीक आहेत, पण कवी लोक जरा स्वप्नांच्या दुनियेत वावरत असतात. त्या कवितांनी ना उदरनिर्वाहाची सोय होते, ना शाळेच्या इन्स्पेक्शनला उपयोग होतो.

पण कदाचित असेही होईल की तुमची तरुणपणातील स्वप्ने उसळी मारून आणखी वर येतील, तुम्हाला असे वाटेल, की शाळेत येणाऱ्या प्रत्येकाला व्यवस्थित आणि उचित शिक्षण मिळायला हवे. पण हे या शिक्षण व्यवस्थेत शक्य नाही. हे तर तुमच्या लक्षात येईलच. जर का तुम्ही या व्यवस्थेच्या मुळाशीच घाव घालू बघाल तर तुम्हाला नोकरीला मुकावे लागेल. मग तुम्हाला शाळा सोडून या विशाल दुनियेच्या परिवर्तनाच्या लढाईत यावे लागेत. आमच्याबरोबर मग तुम्ही तुमच्यापेक्षा वयाने मोठ्या असूनही अडाणी असणाऱ्या लोकांना ज्ञान ही किती मनोहारी चीज/गोष्ट आहे हे सांगाल. मानव समाज कसा असला पाहिजे आणि कसा असू शकतो, ते समजावाल. तुमच्यासारख्याच इतरांबरोबर एकजूट करून तुम्ही वर्तमान समाजव्यवस्थेला मुळापासून बदलण्यासाठी धडपड करू लागाल आणि जगात खरी एकता, खरा बंधुभाव आणि अनंतकाळपर्यंत टिकणारे स्वातंत्र्य यावे यासाठी आपले सर्वस्व पणाला लावाल.

**कलाकाराचे स्वप्न .....**

आणि शेवटी कलाकार, शिल्पकार, चित्रकार, कवी, संगीतज्ञ यांना विचारतो की, तुमच्या पूर्वीच्या पिढ्यांमधील कलाकारांच्या हृदयामध्ये एक आग होती, ज्वाला होती, ती आज कुठे आहे? तुम्हाला जाणवत नाही का, की कलेच्या क्षेत्रामध्ये आज अगदी सामान्य/अतिसामान्य कृतीच दिसून येत आहेत? अर्थात या व्यतिरिक्त दुसरे असूच काय शकते? इतिहासातील घटनांचे पुनरावलोकन आणि निसर्गातील नित्य नूतन आविष्कारांचे निरीक्षण यातून मिळणाऱ्या प्रसन्नतेतूनच मध्ययुगातील मोठमोठ्या कलाकृती निर्माण झाल्या. आत ती प्रसन्नता कोठे आहे? ज्यांच्या प्रभावामुळे कलेमध्ये जीवनाचे सत्य सापडू शकेल असे काही क्रांतिकारी आदर्शही नाहीत. त्यामुळे आपल्या कलेचा उद्देश आज केवळ नक्कल करीत राहाणे एवढाच राहिलेला आहे. कष्ट करून आज आपण कसले चित्र काढतो



तर एखाद्या पानावरच्या दवबिंदूचे. आपले सर्वोत्कृष्ट चित्र असते एखाद्या गायीच्या पायाची हुबेहुब केलेली नक्कल आणि आपल्या कवितांमध्ये काय लिहिलेले असते ते कुणालाही कळत नाही. तू विचारशील, मग मी काय करायचे? माझे उत्तर असेल – तुझ्या हृदयात तूच डोकावून पाहा. तिथे कसली आग पेटली आहे? तिथेही नुसतेच रंगीबेरंगी चकचकीत दिवे असतील तर तूही काही वेगळे करू शकणार नाहीस. मग तुझीही प्रतिमा व्यापाऱ्यांची दुकाने सजवण्यापुरती किंवा लोकांची बालीश, सवंग करमणूक करण्यापुरतीच शिल्लक राहील. आत्तासुद्धा मला तुझ्यासारखे अनेकजण त्याच रस्त्याने जाताना दिसत आहेत, तेही अतिशय वेगाने.

पण जर तुला मनुष्यजातीबद्दल प्रेम असेल, तुझ्या हृदयाच्या तारा साऱ्या समाजाच्या सुखदु:खाने छेडल्या जात असतील, एका खऱ्या कवीप्रमाणे जीवनाचे संगीत तुला ऐकू येत असेल तर तुझ्या आजूबाजूच्या शोकसागराच्या उसळणाऱ्या लाटा पाहताना हे सारे भुकेने व्याकूळ होऊन मरणारे, खाणीमध्ये नरकयातना भोगणारे लोक, आपले घरदार सोडून देशोधडीला लागलेले, दुसऱ्या देशात जायला भाग पडलेले निर्वासितांचे लोंढे, काहीही कारण नसताना माणसे मारणारी ही महाभयानक युद्धे, हे सारे पाहताना, शौर्याऐवजी भ्याडपणाचा आणि दृढ निश्चयाऐवजी कपट कारस्थानांचा विजय झालेला अनुभवताना तू असा उदासिन राहू शकणार नाहीस! तू नक्कीच पुढे येऊन शोषितांच्या बाजूने उभा राहशील कारण तुला माहित असेल की तुला ज्याची आस आहे 'सत्य, शिव, सुंदर' तुला मानवता आणि न्यायदानासाठी लढणाऱ्यांमध्येच सापडेल.

शेवटी तू मला थांबवून म्हणशील, बास आता, ही कसली आफत आहे! विज्ञानाचा शोध घेणे म्हणजे स्वत:च छंद जोपासणे, डॉक्टर होणे म्हणजे लोकांची फसवणूक करणे, वकिली करणे म्हणजे लुबाडणूक आणि अन्याय करणे, शाळा तर म्हणे खऱ्या शिक्षणाअभावी बंदच होण्याच्या लायकीच्या आहेत आणि समोर आदर्श नसल्याने सगळ्या कला सवंग झाल्या आहेत, तर मग मी करायचे काय?

**खूप काही आहे करण्यासारखे!** एक खूप आकर्षक काम! एक असे काम जे तुझ्या अंतरात्म्याच्या आवाजाशी एकरूप असेल, असे एक ध्येय, जे निर्मळ, सशक्त मनांमध्ये आणखी उत्साह भरेल. मी सांगतो असे कोणते काम आहे ते.

तुझ्यापुढे आता दोन मार्ग आहेत. एक तर नेहमीच तू तुझ्या मनाला आणि सदसद्विवेकबुद्धिला फसवत राहशील आणि अखेर एक दिवस म्हणशील, जोवर मी सर्व प्रकारचे ऐषोआराम उपभोगू शकतो आहे आणि जोवर जनता माझ्या मार्गात येत नाही, तोवर त्या जनतेला खड्ड्यात जाऊ दे ना. मला काय त्याचे?

असे झाले नाही तर मात्र तू लढाईत सामील होशील. या समाजव्यवस्थेच्या विरोधातील लढाईत! आत्तापर्यंत आपण जे विश्लेषण केले, त्यातून हेच समोर येते. आपल्या आजूबाजूला नि:पक्षतेने पाहाणाऱ्या, कसलेही पूर्वग्रह न बाळगणाऱ्या आणि स्वार्थी हेतूने केल्या जाणाऱ्या युक्तीवादांकडे लक्ष न देणाऱ्या कुणालाही बुद्धीमान माणसाला हाच निष्कर्ष काढावा लागेल.

एकदा हा निष्कर्ष काढला की मग प्रश्न उरतो, मग मी आता काय करायला हवे? अवघड वाटते ना? आता काय, दु:ख देणाऱ्या, अन्यायावर रचलेल्या समाजाकडे पाठ फिरवून संन्यास घेऊन जंगलात जायचे? किंवा 'नायक' बनून सर्व खल-नायकांना धाडधाड गोळ्या घालत सुटायचे? नाही, असले काहीतरी अचाट करून उपयोग नाही. आणि त्याची गरजही नाही. ऊठ, तुझ्यासारखाच विचार करणारे आसपास शोधू लाग - आणि ते नक्कीच सापडतील. तू आणि मी थोडेस आभाळातून पडलोय? - अभ्यास कर, विचार करायला लाग, तुझ्यासारख्या विचार करणाऱ्यांबरोबर नाते जोड, समाजाकडे डोळे उघडून प्रेमाने पाहा, लोकांशी नाते जोड - आणि मग सगळे मिळूनच उत्तर शोधू. पुढचा मार्ग सर्वांना मिळूनच सापडेल!

## श्रमजीवी आंदोलने

तू जरा डोळे उघडून पाहा, तुला दिसेल की आजवर नेहमीच आणि आजही जिथे जिथे असे कष्ट करणारे आणि आयते बसून खाणारे असे दोन वर्ग निर्माण झालेत, तिथे तिथे कष्टकऱ्यांची आंदोलनेही उभी राहिलीत. ऐतखाऊ लोकांच्या गुलामीतून मुक्त होणे आणि न्याय व समानतेच्या पायावर उभ्या असणाऱ्या समाजाची निर्मिती करणे हीच या आंदोलनांची उद्दिष्टे राहिली आहेत. आता आपल्या दु:खाला वाचा फोडणे एवढेच केवळ पुरेसे नाही. आता त्या जागृत झालेल्या कष्टकरी समाजाची दु:खभरी गाणी म्हणण्याने समाधान होत नाही. जमीनदाराच्या अन्यायाने पिचून दबून राहणाऱ्या शेतकऱ्यांचा जमाना गेला आता. आजही या लोकांना त्यांचे अधिकार मिळत नाहीत. पण आज त्यांना कष्टाची किंमत माहीत आहे. आज बहुसंख्य लोकांना दु:खात खितपत ठेवणाऱ्या या व्यवस्थेऐवजी सर्वांना सुखी करणारी व्यवस्था काय असू शकेल याचा ते विचार करतात. निर्मळ, स्वाभाविक ज्ञान, निरीक्षण आणि आपले दु:खाचे अनुभव, एवढीच साधनं घेऊन ते आपल्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करतात. आपल्यासारखेच दु:ख भोगणाऱ्यांना एकत्र करण्यासाठी ते आपली संघटना बनवतात. जगभर असे छोटे मोठे गट आहेत. ते आपल्यासारख्या इतर देशातील कष्टकरी जनतेशी नाते जोडतात आणि देशादेशातील युद्धे बंद व्हावीत यासाठी (दिखाऊ, भंपकपणा करणाऱ्या, बाष्कळ बडबड करणाऱ्या परोपकारी



समाजसेवकांपेक्षा) अधिक महत्त्वपूर्ण काम करतात. आपले हे ठिकठिकाणचे बांधव काय काम करतात हे जाणून घेण्यासाठी, त्यांच्याशी ओळख व्हावी म्हणून आणि आपल्या विचारांचा विकास व प्रसार व्हावा यासाठी ते खूप परिश्रम करून कष्टकरी जनतेची वर्तमानपत्रेही चालवतात.

कामगारांची, कष्टकऱ्यांची ही लढाई त्यांच्या अंतिम विजयापर्यंत थांबणार नाही. कित्येक वेळा थकून, कधी निश्चय कमी पडल्याने, अत्याचाऱ्यांमुळे अनेक कार्यकर्ते लढाई सोडून देतात आणि त्यांच्या जागी नवे कार्यकर्ते शोधावे लागतात. कधी हिंसाचाराला, बंदुकीच्या गोळ्यांना नेते, कार्यकर्ते बळी पडतात आणि मग सगळे आंदोलन पुन्हा पहिल्यापासून उभे करावे लागते. सगळी संघटना पुन्हा बांधावी लागते. या सगळ्यात खूप शक्ती खर्च होते.

तहान-भूक-झोप विसरून, स्वत: शिकून, हे कामगार इतरांसाठी वर्तमानपत्रं चालवतात. त्यांच्या आंदोलनाला आधार असतो तो पोटाला चिमटा घेऊन गोळा केलेल्या पैशा-पैशाचा! वडापाव वर दिवस काढून ते आपल्या निढळाच्या घामाचा पैसा अशा कामासाठी वाचवतात आणि आपल्या मालकाचा, पोलिसांचा, सरकारचा रोष ओढवून घेण्याचा धोका घडोघडी / सतत पत्करतात.

जेव्हा तुम्ही लोकांमध्ये जाल तेव्हा तुम्हाला या सगळ्या गोष्टी दिसतील. या अखंड लढाईत, कष्टाच्या ओझ्याखाली दबलेला गरीब मजूर चिडून म्हणतो, आपल्या पैशावर शिक्षण घेणारा तरूण आज कुठे आहे? ज्याच्यासाठी आम्ही अन्न, धान्य, वस्त्रांचे उत्पादन केले, ज्याच्यासाठी आम्ही अर्धपोटी राहून, अमानवी ओझी वाहून ही घरे, शाळा, प्रयोगशाळा बांधल्या, आपले रक्त आटवून या सुंदर पुस्तकांची छपाई केली! मानव समाजाचं विज्ञान आपल्याला समजले आहे, असा दावा करणारे ते प्राध्यापक कुठे आहेत? आजही ते माणसापेक्षा एखाद्या छोट्या किड्याला जास्त महत्त्व देतात. ते पुस्तकातून स्वातंत्र्याच्या मूल्याचा प्रचार करतात. पण आमच्यासारख्या रोज पायाखाली तुडवल्या जाणाऱ्यांच्या मदतीसाठी मात्र काहीही करत नाहीत. हे लेखक, हे कवी, हे चित्रकार - सगळे ढोंगी आहेत. तसे तर हे डोळ्यात अश्रू आणून सामान्य लोकांच्या दुर्दशेचे वर्णन करत फिरतात, पण आमच्या कामाला मदत मात्र शून्य!

सुशिक्षित, मध्यमवर्गातील काही भ्याड लोक अलिप्त असल्याचा आव आणून शांतपणे चैनीत राहातात. बाकी काही जण या लढाईचाच तिरस्कार करतात. त्यांच्या ऐतखाऊपणावर हल्ला करणाऱ्यांना निपटून काढायला ते सदैव डोळ्यात तेल घालून तत्पर असतात. बरेचदा असेही तरूण भेटतात, जे रोमांचकारी लढाईची स्वप्ने पाहातात. ते सनसनाटी आणि साहसी घटनांच्या शोधात असतात. पण जेव्हा त्यांच्या हे लक्षात येते की लढाईपर्यंत पोहोचण्याचा मार्ग लांबलचक आहे

आणि त्यात खाचखळगे आणि काटेकुटेच जास्त आहेत, तेव्हा ते समाजासाठी काही करणे वगैरे गप्पा विसरून आपापल्या उद्योगाला लागतात. बहुतेक वेळा अशांना पुढारीपणाची महत्त्वाकांक्षा असते आणि लोकांच्या गळ्यातला ताईत बनण्याची इच्छा असते. पण ते स्वत: समानता वगैरे मूल्यांचा पुरस्कार करतात ते संघटनेतच लागू करुया असे लोकांनी म्हणताच ते लोकांचे विरोधक बनतात आणि जेव्हा श्रमजीवी आंदोलन या नेत्यांना बाजूला टाकून पुढे जाऊ लागते तेव्हा ते त्या आंदोलनालाच चिरडून टाकायला मागेपुढे पहात नाहीत.

यातीलच काही अहंकारी लोक स्वत:चा अहं कुरवाळण्यासाठी सगळ्या जनसमूहाचा अपमान करण्याचा मार्ग अवलंबतात, किंवा लढणाऱ्या लोकांची बदनामी करून भ्याडासारखे लपून बसतात. जनतेच्या खऱ्याखुऱ्या आंदोलनाला मध्यमवर्गातील सुशिक्षित म्हणवणाऱ्या तरूणांची बरेचदा एवढीच मदत मिळत असते.

आता हे सगळे ऐकून तू म्हणशील, मी काय करू? अरे, इतके सगळे काम आहे, तुला दिसत नाही का? लोकांच्या आंदोलनाने हे केवढे भव्य काम हाती घेतले आहे. हजारो-लाखो नवयुवकांना त्यांच्या साऱ्या क्षमता, त्यांचा जोश, बुद्धिमत्ता वापरून या कामाला पुढे न्यायचे आहे. सर्वसामान्य जनतेला, कष्टकऱ्यांना सर्व समाजाला मदत करण्याची ही केवढी मोठी संधी आहे तुझ्यापुढे! ऐक, तू काय काय करू शकतोस ते!

तू विज्ञान शिकला असशील, नवीन समाज कसा हवा याचा विचार केला असशील, समाजात विज्ञानाचे काय स्थान असायला हवे याचा विचार केलेला असशील तर तुझ्या हेही लक्षात आले असेल की ते साध्य करण्यासाठी विज्ञानाच्या सर्व शाखांचा सर्वांगीण पुनर्विचार, पुनरभ्यास आवश्यक आहे. ते काम तूच का हाती घेत नाहीस? आज इतिहास म्हणून जे लिहिले जाते, त्या तर केवळ राजे, महाराजे, सत्ताधाऱ्यांच्या कहाण्या असतात. तू एक असा इतिहास लिही ज्यात मानव समाजाच्या विकासाच्या टप्प्यांमध्ये सर्वसामान्य माणूस कसा जगत होता याचे वर्णन असेल. आजचे अर्थशास्त्र हे मालदार लोकांना सामान्य जनतेला आणखी कसे लुटता येईल ते सांगणारे शास्त्र बनलेय. तेही पुन्हा लिहिले जायला हवे. त्याचे सगळे सिद्धांत वेगळ्या कसोट्यांवर तपासले जायला हवेत. त्याचप्रमाणे मानवशास्त्र, समाजशास्त्र, मनोविज्ञान सगळ्यांचेच पूर्णपणे परिवर्तन व्हायला हवे आहे. खरेतर, विज्ञानाच्या सर्वच शाखांचा नव्याने विचार व्हायला हवा आहे. तर मग कर सुरू हे काम! आपल्या क्षमता या नवीन कामामध्ये लाव. आपल्या प्रखर बुद्धिचा उपयोग आम्हा लोकांचे जुनेपुराणे अंधविश्वास तोडण्यासाठी कर. तुझे व्यवस्थापकीय कौशल्य लोकांची संघटना बळकट करण्याच्या कामी येऊ दे.



वैज्ञानिक संशोधनामध्ये जो निर्भीडपणा आवश्यक असतो तो आमच्या प्रत्येक कामात यावा यासाठी आम्हाला मदत कर आणि जशी प्राचीन काळी विज्ञानाच्या विजयासाठी शास्त्रज्ञ लढल्याची उदाहरणं आहेत, तसाच तूही सत्याच्या रक्षणासाठी स्वत:ला झोकून दे, आमच्यापुढे एक आदर्श बनून रहा.

तू डॉक्टर असशील आणि काही कडवट अनुभवांतून जीवनाचे सत्य जाणून घेतले असशील तर तेच कटू सत्य आम्हालाही सांगत राहा. सांग की मनुष्य आजच्या त्याच्या अवस्थेतल्या नरकयातना भोगत राहीला तर सारा मनुष्य समाज अध:पतनाच्या दिशेनेच वाटचाल करील. तू लोकांना समजावून सांग की आरोग्याच्या सर्वसामान्य नियमांच्या अगदी विरोधी परिस्थितीमध्येच नव्या पिढीचा जन्म आणि वाढ होत राहिली तर डॉक्टरांची सगळी औषधे रोग मिटवायला पूर्णपणे असमर्थ आहेत. लोकांना दाखवून दे रोगांची खरी कारणं कोणती आहेत ती आणि हेही सांग की त्या कारणांना मुळापासून नष्ट करणे हाच उपाय आहे. ती कारणे कशी नष्ट करायची हेही शिकव त्यांना. आपली हत्यारे घेऊन ये. वेगाने सडत चाललेल्या या समाजावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे. स्वस्थ आणि सुखी जीवन जगण्याचा मार्ग तूच लोकांना दाखवून दे. एखाद्या तज्ज्ञ डॉक्टरप्रमाणे सत्य समोर उलगडून ठेव आणि निर्जीव झालेला भाग कापून काढला नाही, तर तो साऱ्या शरीरात विष पसरवेल हे गोष्ट विषद करून सांग.

तू इंजीनिअर असशील तर तुझ्या अभ्यासातून तुला काय ज्ञान मिळाले ते आम्हालाही सांग. आयुष्यातील कटू अनुभव पाहून कित्येक लोकांचा आज भवितव्यावरचा विश्वासच उडाला आहे. त्यांना सांग की आजवर मानवाने जे ज्ञान मिळवलेय त्याचा उपयोग करून भविष्य किती सुंदर बनवता येऊ शकते! कारखान्यात, बांधकामात, प्रत्येक कामात योग्य सुधारणा केल्या तर किती आश्चर्यकारक बदल घडू शकतात, जीवन किती सुकर होऊ शकते. हेही सांग की सर्वसामान्य माणसाच्या गरजांचा विचार करून उत्पादन किती मोठ्या प्रमाणात वाढवता येऊ शकते.

जर तू कवी, चित्रकार, शिल्पकार संगीतज्ञ असशील आणि तुझे खरे कर्तव्य काय याचा विचार करत असशील तर आमच्या बरोबर चल. आपली लेखणी, कुंचला, छिन्नी यांना लोकहिताच्या चळवळीसाठी राबव. आपल्या जोशपूर्ण कविता किंवा भावपूर्ण चित्रांमधून जनसमूहांच्या अत्याचारविरोधी लढ्यांचे शौर्याने रसरसलेले चित्रण कर. नवयुवकांच्या हृदयामध्ये क्रांतिकारी उत्साहांची आग पेटव, लोकांना त्यांच्या आजच्या वीभत्स वर्तमानाचे दर्शन घडव आणि त्यामागची कारणेही पटवून दे. जनतेपुढे नव्या समाजाचे स्वप्न उभे कर. आजच्या समाजाच्या अडाणीपणामुळे अडकून राहिलेला परिवर्तनाचा मार्ग मोकळा झाला तर आपले

जीवन किती सुंदर होऊ शकते याचे चित्र त्यांना दिसू दे. ज्यांच्याजवळ ज्ञान आहे, संभाषणचातुर्य आहे, हुशारी आहे आणि कष्टाची तयारीही आहे असे तुम्ही सगळेजण या, तुमच्या दोस्तांनाही घेऊन या. ज्यांना तुमच्या मदतीची सर्वाधिक गरज आहे त्यांच्यासाठी काम करा. पण एवढे लक्षात असू द्या की या आंदोलनात सामील होताना तुम्ही कोणी वरिष्ठ म्हणून नव्हे तर एका जिवंत सळसळत्या जीवनात प्रवेश करून स्वत:चे जीवन समृद्ध करायला येत आहात, स्वत: उन्नत होण्यासाठी येत आहात. तुमचे काम केवळ लोकांना उपदेश करणे हे नाही तर त्यांच्या इच्छा आकांक्षा समजून घेणे, त्यांना उचित रुप देणे आणि त्यांना कार्यरत करणे हे आहे. हे काम तुम्हाला न रेंगाळता पण घाईही न करता तरूणाईचा सारा जोश, उत्साह आणि आजवरचा अनुभव यांच्या जोरावर पूर्ण करायचे आहे. केवळ त्या कामातूनच तुम्हाला सर्वार्थाने श्रेष्ठ, विवेकपूर्ण जीवन जगणे शक्य होईल. तुम्हाला जाणवेल की या कामात केलेल्या प्रयत्नांचे योग्य फळ मिळत आहे. आणि अशा रितीने तुमच्या इच्छा आणि तुमचे काम एकरूप होईल. तेव्हा तुमच्या क्षमतांमध्ये अभूतपूर्व वृद्धी झाल्याचे तुमच्या लक्षात येईल. अशा प्रकारे तुम्ही जनसमूहाबरोबर राहून सत्य, न्याय आणि समानतेसाठी सतत लढत राहाल आणि त्यातूनच सर्वसामान्य जनतेचा दुवाही मिळवाल. यापेक्षा श्रेष्ठ जीवन काय असू शकेल?

इतका वेळ घालवल्यानंतर तुम्हा शिकल्यासवरल्या तरूण मुला–मुलींना माझे हे म्हणणे नक्कीच थोडेफार तरी पटले असेल की तुमच्या जीवनातील विसंगती दूर करण्यासाठी तुम्हाला सर्वसामान्य लोकांबरोबर त्यांच्या लढाईमध्ये सामील व्हावे लागेल आणि समाज परिवर्तनासाठी काम करावे लागेल. आता तुम्हाला हे एकदम तर्कशुद्ध, स्वाभाविकही वाटू लागले असेल. पण हेही लक्षात ठेवा की समाजातल्या वर्तमान तत्त्वज्ञानाचा ज्याच्यावर प्रभाव आहे अशा एखाद्याला हे समजावणे खूपच कठीण काम आहे. समाजातील शोषक वर्गाच्या खोट्या प्रचारातील कितीतरी तर्कांचे तुम्हाला त्यासाठी खंडन करावे लागेल, कितीतरी पूर्वग्रह खोडून काढावे लागतील आणि स्वार्थामुळे उपस्थित होणाऱ्या शंका दूर कराव्या लागतील.

आता मला गरीब घरातल्या मुलांना काही सांगायचे आहे. खरे तर तुम्हाला फार काही सांगायला नकोच. तुम्ही जास्त शिकला नसाल किंवा अगदी धाडसीही नसाल, तरीही तुमच्यावरचे परिस्थितीचे ओझे तुम्हाला कष्टकऱ्यांच्या लढ्यात सामील व्हायला भाग पाडेलच. जो तरूण/तरूणी कष्टकरी गरिबाच्या घरी जन्माला येऊन लोकांच्या चळवळीत सामील होत नाही, त्यांना आपले हित कशात आहे हे समजत नाही आणि आपले कर्तव्य काय, जबाबदारी काय हेही कळत नाही, असे म्हणायला हवे.



तुला आठवलं का, तू अगदी लहान होतास आणि धो–धो पडणाऱ्या पावसात डोक्यावर प्लॅस्टिकचे चिरगुट पांघरून कुडकुडत वळचणीखाली उभा होतास. तेव्हाच तू ऐटदार कपडे घालून पावसाचा स्पर्शही न होता गाडीतून जाणाऱ्या मुलांना पाहिलेस. रस्त्यावरचे पाणी गाडीने तुझ्या अंगावर उडवले तेव्हा ती चेष्टेने खिदळत होती. त्या अवस्थेतही तुला माहित होते की गाडीतून जाणारी ती मुले तुझ्यापेक्षा हुशार किंवा तल्लख होती असे मुळीच नव्हते. तरीही तू त्यानंतर परिस्थितीच्या ओझ्याखाली, एका घाणेरड्या कारखान्यात दिवसरात्र काम करू लागलास. तिथली यंत्रे, त्यांचे कर्कश्श आवाज, अरेरावी करणारे सुपरवायझर यांच्या दबावाखाली पिचून गेलास आणि त्याच काळात ती गुबगुबीत गोंडस मुले निश्चिंतपणे शाळा कॉलेज्यांमध्ये जात राहिली. आणि आता? आता तुझ्यापेक्षा कमीच तल्लख असणारी ती मुले तुझे मॅनेजर, मालक बनून चैनीत जगत आहेत. आणि तुझी परिस्थिती काय आहे सध्या? रोज कामावरून तू एका गलिच्छ झोपडपट्टीतल्या तुझ्या झोपडीत परत येतोस. त्या छोट्या झोपडीत तुम्ही ५–६ जण जनावरांसारखे राहाता. तुझी अकाली म्हातारपण आलेली आई तुला भाकरी आणि वरणाचे पाणी एवढेच देऊ शकते. तुझ्या डोक्यात दुकानदारांची राहिलेली उधारी आणि झोपडीच्या दादाचा हप्ता, एवढेच विचार असतात.

तुझ्या आई–बापानी गेल्या ३०–४० वर्षात जे सोसले, तेच जिणे तुलाही जगायचे आहे का? तुझ्या मालकाला गाडीतून फिरता यावे म्हणून तू कष्ट करत राहणार आणि तुझे आयुष्य मात्र फक्त उद्याच्या भाकरीची चिंता करण्यात घालवणार? मूठभर आळशी लोकांना जास्तीतजास्त चैनीत राहाता यावे म्हणून तू तुझ्या जीवनातल्या साध्यासुध्या आनंदालाही मुकणार का? कष्ट करून, चक्रात पिळून तुझी शक्ती संपून जाईल आणि तुझ्याच्याने काम होईनासे झाले की तुझे हाल कुत्राही पाहणार नाही. असे आयुष्य तुला हवे आहे का? कदाचित तू हा सगळा विचार करून परिस्थिती स्विकारली असशील. बाहेर पडण्याचा कुठलाच मार्ग न दिसल्याने तू म्हणत असशील, सगळे जगच अशा चक्रात सापडले आहे, त्याला काय करणार? मी एकटा तर परिस्थिती बदलू शकत नाही. मग आहेत ते सहन केलेच पाहिजे. उगीच कशाला डोके शिणवून घ्या, आहे तसेच जगत राहायचे झाले!

फार छान! असाच विचार करत राहा! जीवनातील खाचखळगे आणि प्रत्येक पावलावर खाव्या लागणाऱ्या ठेचा तुला बरेच काही शिकवतील. कधीतरी काहीतरी आक्रित घडेल तेव्हा तुझे डोळे उघडतील.

कधीतरी प्रचंड मंदीचा, कधीच न संपणाऱ्या मंदीचा काळ येईल, तिच्या फटकाऱ्याने असंख्य उद्योग उध्वस्त होतील. हजारो कामागार बेकार होतील,

त्यांची कुटुंब देशोधडीला लागतील. तूही बाकी लोकांप्रमाणे हात पाय मारण्याचा प्रयत्न करशील पण हळूहळू तुला तुझी माणसं भूकेने व्याकूळ होऊन मरणपंथाला लागलेली दिसतील. अन्न नाही, औषधपाणी नाही, अशा अवस्थेत झोपडीतल्या पटकुरावर पडून ती शेवटचे दिवस मोजू लागतील. मालदार लोक मात्र शहरातल्या सुंदर रस्त्यांवर, छान छान घरात, हॉटेलात, क्लबात मजा करत असतील. ते कधीच गरीब लोकांचा विचार करणार नाहीत. आणि तेव्हा तुला तुझ्या जगण्याचा उबग येईल. तेव्हा तू विचार करशील तर तुला कळेल या मंदीची कारणे काय आहेत, लाखो लोकांना मूठभर लोकांच्या हावरट नफेखोरीची शिकार बनवायला कारणीभूत ठरणारी ही दुनिया आहे तरी काय? तेव्हाच तुला समजेल की आताच्या या जगामध्ये मुळापासून बदल करायला हवा आहे आणि त्यासाठी सगळ्या लोकांनी एकत्र यायला पाहिजे.

मंदीचे संकट राहू दे, तुझ्या आयुष्यातील एक छोटी घटना पाहू. एक दिवस तुझा मालक तुझी मजुरी कमी करेल, जेणेकरून त्याच्या नफ्यात वाढ होईल. तू थोडासा जरी विरोध करू पाहाशील तर तो म्हणेल, ''नको असेल तर सोड नोकरी, काही जबरदस्ती नाही.'' तेव्हा तुला समजेल की तुझा मालक फक्त नफ्याकरता तुला गाढवासारखा राबवून घेतो. एवढेच नव्हे तर त्याच्या लेखी तुझी तीच लायकी आहे. तू त्याच्याकडे नोकरी करतोस या एका गोष्टीचा गैरफायदा घेऊन तो तुला पूर्णपणे त्याचा गुलाम करायला पाहातो आहे. त्याक्षणी एकतर तू मान खाली घालून सगळा स्वाभिमान गुंडाळून ठेवून सगळे ऐकून घेशील आणि मग नंतरचे सगळे आयुष्य असे असंख्य अपमान गिळूनच जगशील. नाहीतर त्याक्षणी तुझे रक्त पेटून उठेल. स्वत:चे इतके पतन झालेले तुला सहन होणार नाही. आणि तू त्या उर्मट माणसाला जशास तसे उत्तर देशील. अर्थातच तुला नोकरी सोडून बाहेर भटकावे लागेल आणि मग तुझ्या लक्षात येईल की ''ऊठ, उभा रहा आणि या गुलामीच्या विरोधात लढ'' हे कुठेतरी ऐकलेले शब्दच खरी दिशा दाखवतात, आर्थिक, राजकीय गुलामगिरी नष्ट करण्यासाठीच्या लढ्याची धुरा आपल्या खांद्यावर घेशील.

एक दिवस तुला शेजारी राहाणाऱ्या त्या गोड मुलीची हकीकत समजेल. अवखळ चालणे, बोलणे, आणि प्रसन्न स्वभाव तुला किती आवडायचा! तिच्या वयाबरोबरच तिच्या घरची कुस्थितीही वाढत गेली आणि शेवटी तिचा काका-मामा तिला शहरात घेऊन गेला. तिला आशा होती कुठे धुण्या-भांड्याची काम करून का होईना पण पोटभर खायला मिळेल. तिला काम देण्याचे आश्वासन देऊन शेजारच्या एका तरूण पोराने गैरफायदा घेतला आणि नंतर सोडून दिले. जन्माला आलेल्या पोराची जबाबदारीही नाकारली. ती पोरगी खरेच जिगरबाज होती



शेवटपर्यंत परिस्थितीशी लढत राहीली. पण शेवटी उपासमार आणि आजारपण यांच्याशी दोन हात करता करता तूटून गेली बिचारी! कुठल्याशा धर्मादाय दवाखान्यात बेवारशी मरून गेली. पोराचे काय झाले कुणालाच पत्ता नाही!

याच्यावर आता तू काय करशील? पुन्हा आता तुझ्यासमोर दोन पर्याय आहेत. ही त्रासदायक आठवण तू मनातून काढून टाकशील आणि म्हणशील ''तिच्यासारख्या अशा कितीक असतात. जाऊ दे जे झाले!'' कदाचित एक दिवस त्या मुलीची आठवणही तुला राहणार नाही आणि तुही इतर निर्लज्ज पशूंसारखाच एखाद्या गरीब पोरीकडे बघून घाणेरडे शेरे मारू लागशील. किंवा मग ही हकीकत तुझ्या हृदयाला हात घालेल आणि त्या धोकेबाज नरपशूला शोधून काढून त्याच्या कानाखाली आवाज काढायला तुझे हात शिवशिवू लागतील. थोडा गांभीर्याने तू रोज घडणाऱ्या अशा घटनांबद्दल विचार करशील तर तुला समजेल की समाज जोपर्यंत दोन भागात विभागला गेला आहे, तोपर्यंत अशा घटना घडतच राहातील. एका बाजूला आहेत गरीब बिचारे पीडित आणि दुसरीकडे गोडगोड भूलथापा मारून फसवणारे वासनांध! तुला समजेल की ही दरी मिटवायची वेळ आता आली आहे आणि मग याविरुद्ध आवाज उठवणाऱ्यांमध्ये तूही सामील होशील.

कष्टकरी महिलांनो, या सगळ्या गोष्टी ऐकून तुम्हाला काही वाटले नाही का? तुमच्या मांडीवरच्या त्या गोंडस फुलाला कुरवाळताना तुमच्या मनात कधी त्याच्या भविष्याचा विचार येत नाही का? समाजाची परिस्थिती बदलली नाही तर काय असेल त्याच्या भविष्यात? त्याच्या, तुमच्या छोट्या बहिणीच्या, आणि आजूबाजूच्या सगळ्याच पोरांच्या? तुमच्या पोरानेही त्याच्या बापासारखेच मरेस्तोवर राबावे असे तुम्हाला वाटते का? रोज उठून भाकरी कशी मिळवायची एवढी एकच चिंता त्याच्या मनाला कुरतडत असावी आणि दारूच्या अड्ड्याशिवाय दुसरा कोणताही आनंद त्याच्या जीवनात असूच नये? तुमच्या नवऱ्याने, मुलाने त्या बापाच्या पैशावर माज करणाऱ्या मालकाच्या उनाड पोराच्या दयेवर जगत रहावे असे तुम्हाला वाटते? तुमचा नवरा आणि मुलगा नेहमीच मालकाचा गुलाम बनून राहावेत आणि मालकाने त्यांना चरकात पिळून काढावे, गटारातल्या किड्यापेक्षा त्यांची जास्त लायकी समजू नये अशी इच्छा आहे का?

नाही! शक्यच नाही. मला चांगले माहित आहे की तुमच्या नवऱ्याने कामावरून काढून टाकलेल्या आपल्या सहकाऱ्यांसाठी संप केला आणि मालकाच्या अपमानास्पद समझोत्याला नकार दिला तेव्हा तुम्हाला त्याचा अभिमानच वाटला होता. वर्तमानपत्रातून महिलांनी एकजूट करून जुलमी कारखानदार किंवा जमीनदाराविरुद्ध संघर्ष केल्याच्या बातम्या तुम्ही वाचता तेव्हा तुमचा ऊर भरून येतो. तुमच्या वस्तीत येऊन तुम्हाला अन्यायाविरुद्ध आवाज

उठवण्याचे आवाहन करणाऱ्या तरूण मुलींना पाहून तुम्हाला आपली मुलगी त्या जागी दिसू लागतेच ना?

तुमच्यापैकी प्रत्येकजण – प्रामाणिक, सचोटीने काम करणारे तरूण, स्त्री-पुरुष शेतकरी, कामगार, कारागीर तुम्हाला जेव्हा तुमचे अधिकार काय आहेत हे लक्षात येईल तेव्हा तुम्ही ते मिळवण्याची लढाई लढण्यासाठी आमच्याबरोबर याल. आपल्या बांधवांबरोबर अशा एका क्रांतीची तयारी कराल जी गुलामीचे प्रत्येक नामोनिशाण नेस्तनाबूत करेल. जुन्यापुराण्या सडत चाललेल्या परंपरांच्या बेड्या तोडून संपूर्ण मानवजातीसाठी सुखासमाधानाने परिपूर्ण अशा नव्या जीवनाचा रस्ता खूला करेल आणि अखेरीस खरे स्वातंत्र्य, खरीखुरी समानता आणि निष्कपट बंधुत्त्वाची स्थापना करेल. तेव्हाच सगळे लोक सगळ्यांबरोबर एकत्र येऊन, सगळ्यांबरोबर काम करत आपल्या श्रमांचा, सृजनशिलतेचा संपूर्ण आनंद उपभोगतील. आपल्या सगळ्या क्षमतांचा पुरेपुर वापर करून विकास करून माणसासारखे जगायला लागतील. सुखी होतील.

**आता कुणी असे म्हणू नका की आपण खूप थोडे आहोत. इतके मोठे लक्ष साध्य करण्यासाठी अगदीच कमजोर आहोत. जरा मोजा बरे अन्याय सहन करणारे आपल्यासारखेच किती लोक आहेत!**

आम्ही शेतकरी, दुसऱ्यासाठी काम करतो. सोन्यासारखं गहू पिकवतो. पण स्वत: मात्र सुकी भाकरी खातो. आम्हीच संख्येने कोट्यावधी आहोत. आम्ही कामगार, इतक्या सुरेख, तलम उंची वस्त्रांचे उत्पादन करतो – स्वत:ला किमान एक जाडेभरडे एक चिरगुट मिळवण्यासाठी! आम्ही सुद्धा लक्षावधी आहोतच की! आणि वेळ येईल तेव्हा रस्त्यारस्त्यात, चौकात चौकात वादळासारखे येऊन हजर होऊ आम्ही. आम्ही स्त्रिया अहोरात्र राबराब राबतो, स्वत:च्या घरी, लोकांच्या घरी, कारखान्यात, शेतात, बाजारात. आमच्या अगदी छोट्या छोट्या इच्छाही कधी पूर्ण होत नाहीत. आम्हीही खांद्याला खांदा लाऊन संग्रामात अग्रभागी राहू.

अरे, आपण सगळे, जे रोज मरेस्तोवर कष्ट करतो आणि तरी सगळ्यांकडून हिणवले जातो, आपण सगळे मिळून संख्येने इतके प्रचंड आहोत की कोणीच आपली बरोबरी करूच शकणार नाही. आपण तो समुद्र आहोत जो सगळ्यांना आपल्यात सामावून टाकू शकतो. **ज्या क्षणी आपण सगळे मिळून दुनिया बदलवून टाकायचे ठरवू ना, त्या क्षणीच न्याय मिळालेला असेल. एकच क्षण – दुनियेतील सर्व सुखे त्याच क्षणी आपल्या समोर हजर असतील.**



## आमच्याबद्दल : लोकायत

*कौन आज़ाद हुआ?*
*किसके माथे से गुलामी की सियाही छूटी?*
*मेरे सीने में अभी दर्द है महकूमी का...*
*मादरे-हिन्द के चेहरे पे उदासी है वही....*
*कौन आज़ाद हुआ?*

स्वातंत्र्यानंतर काही वर्षातच अली सरदार जाफरींनी ही कविता लिहीली. पण ह्या ओळी देशाच्या आजच्या परिस्थितीचेही अधिक तंतोतंत वर्णन करतात. कोण स्वतंत्र झालं हा खरा प्रश्नच आहे. हा देश आता फक्त धनिकांचा झाला आहे आणि विकासही फक्त त्यांचाच होत आहे. एकीकडे हे मोठमोठे मॉल्स, अत्याधुनिक गाड्या, एक्सप्रेस हायवेज, जगभरातून आयात होत असलेल्या अय्याशीच्या वस्तू, पंचतारांकित हॉस्पिटल्स... तर दुसरीकडे बहुतांश जनतेला स्वातंत्र्यानंतर जो भाकरतुकडा मिळत होता, तो सुद्धा आता काढून घेतला जात आहे.

गेली दोन दशके जागतिकीकरणाच्या नावाखाली महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्यांना या देशात आमंत्रित केलं जात आहे. देश आज फक्त बड्या देशी-परदेशी उद्योगपतींच्या नग्न नफेखोरीसाठीच चालवला जातोय. ते प्रचंड नफ्याच्या हावेपोटी गरिबांची जंगले, जमिनी, पाणी ह्यांवर हिंस्त्रपणे हल्ले करत आहेत. पोलिस-न्यायालय-राजकारणी-नोकरशहा यांच्या उघडउघड सहकार्याने गरिबांच्या जीवनसाधनांवर ताबा मिळवून त्या ठिकाणी खाण प्रकल्प, विशेष आर्थिक क्षेत्राचे प्रकल्प, आलिशान गृह प्रकल्प, इ.इ. उभे करत आहेत. यासाठी आपल्या देशातील कायदेकानूनही बदलले जात आहेत. खाजगीकरणाच्या नावाखाली जनतेच्या श्रमांनी आणि पैशांनी उभे केलेले सार्वजनिक उद्योग आणि बॅंका व विमा कंपन्या कवडीमोल किंमतीत त्यांना सोपवल्या जात आहेत. शेतीव्यवस्थाही त्यांच्या ताब्यात देण्यासाठी धोरणे बदलली जात आहेत. परिणामी लाखो शेतकरी आत्महत्या करत आहेत, देशातील ६०% जनता ग्रामीण भागातून शहरातील बकाल वस्त्यांमध्ये ढकलली जात आहे. छोटे उद्योग नागवले जात आहेत. शिक्षण, आरोग्य, वाहतूक व्यवस्था, वीज, पाणी, ह्यांसारख्या अत्यावश्यक सेवा सुद्धा नफा आणि फक्त नफा कमावण्याचं साधन बनवल्या जात आहेत. आपण काय खावं, प्यावं, ल्यावं, चिंतावं, पहावं, हे ठरवण्याची मक्तेदारीच जणू बहुराष्ट्रीय कंपन्यांनी घेतली आहे. म्हणून त्यांच्या भांडवलाबरोबर त्यांची संस्कृतीही त्यांनी आपल्याकडे रुजवली आहे. **आता आपल्या देशावर कुणी थेट शासन करण्याची गरज नाही. आर्थिक नाड्या आपल्या हातात ठेवून त्यांनी परत एकदा नवी गुलामी आणली आहे.**

जीवनावश्यक वस्तूंची प्रचंड वाढती महागाई, जागोजागी बोकाळलेला भ्रष्टाचार, खोटेपणा, कॉलेजची आकाशाला भिडलेली फी आणि नोकरीची आशा

शून्य. शिवाय आपणच नालायक आहोत असं वाटायला लावणारी शिक्षणव्यवस्था आणि परीक्षा पद्धती, नोकरीचं खापर राखीव जागांवर फोडणारी जात जमातवादी समाजव्यवस्था आणि देवाधर्माच्या नावाखाली माणसाला माणसापासून वेगळं पाडणारं धर्मांध राजकारण, माणसांच्या आजाराचा होत असलेला व्यापार... हे आजचं वास्तव आहे.

अर्थात सर्वसामान्य जनता विदेशी कंपन्यांचे व येथील धनदांडग्यांचे हे खेळ मूकपणे बघत बसलेली नाही. वसंतात जसं प्रत्येक कानाकोपऱ्यात फुलं फुलायला लागतात, तसंच देशभरात निरनिराळ्या ठिकाणी लोकांनी एकत्र यायला, संघटित व्हायला, आणि आपले संघर्ष बुलंद करायला सुरुवात केली आहे. आत्ता जरी हे संघर्ष छोटे असले, तुटक असले, तरी भविष्य या छोट्या छोट्या संघर्षातच दडलेलं आहे. ते जेव्हा मजबूत होतील, एकत्र येतील आणि आणखी लोक या लढ्यात सामील होतील तेव्हा ते एक मोठी ताकद बनतील.

आपण बघ्याची भूमिका सोडली पाहिजे, चांगल्या भविष्याची स्वप्न पाहिली पाहिजेत, जग बदलु शकतं ह्यावर विश्वास ठेवला पाहिजे. हो ! दुसरं जग शक्य आहे. पण त्यासाठी आपलेही छोटे-छोटे लढे सुरु केले पाहिजेत. हिमालयातल्या छोट्या छोट्या नद्यांचे प्रवाह एकत्र येऊन त्यांची गंगा बनते, तसंच हे लढेही एकत्र येतील. म्हणूनच हे व्यासपीठ.

भारतातील वैदिक काळापासूनचा विचार म्हणजे लोकायत. लोकायत ही दैववाद झुगारणारी वास्तववादी, विवेकवादी जीवनदृष्टी आहे. जीवन सम्यक रितीने जगण्याचा हा विचार आहे. समस्या मानवनिर्मित आहेत, त्यापासून पळून न जाता त्यांना सामोरे गेले पाहिजे, ही प्रेरणा लोकायती विचार आम्हाला देतात. ही परंपरा आम्ही स्वीकारतो. म्हणूनच या व्यासपीठाचे नाव लोकायत. ज्यांना हे जग बदलण्यासाठी आपणही काही करावं असं वाटतं त्यांच्या सहकार्याने आम्ही विविध कार्यक्रम राबवतो.

- शिक्षण-वीज-आरोग्यसेवा ह्यांचे बाजारीकरण, शहरातील सार्वजनिक वाहतूक समस्या, अणुऊर्जेची घातकता, बी.टी. वांग्यासारख्या जनुकीय बदल असलेल्या अन्नांचे दुष्परिणाम, जीवनावश्यक वस्तूंची वाढती महागाई, यांसारख्या लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर व्यापक जनजागृती करून लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न करतो. त्याशिवाय 'पेप्सी कोक भारत छोडो', 'अजून भोपाळ नकोत', 'न्यायव्यवस्थेचे उत्तरदायित्व आणि सुधारणा' यांसारख्या राष्ट्रीय अभियानांमध्येही आमचा सक्रिय सहभाग आहे. त्यासाठी या प्रश्नांवर आधारित पथनाट्य, पोस्टर प्रदर्शन, गाणी अशा कला प्रकारांचा उपयोग करतो, तसेच सेमिनार, व्याख्यान, धरणे, मोर्चे, जाहीर सभाही आयोजित करतो.



- समाजातील विविध समस्या, विशेषत: विकासाच्या नावाखाली उद्ध्वस्त होत असलेले जगजीवन, जात जमातवाद, चंगळवाद, अमेरिकेचा साम्राज्यवाद, जागतिक तापमान वृद्धी, इ. अनेक विषयांवर माहितीपट-चित्रपट दाखवले जातात, त्यांवर चर्चा घडवली जाते. त्यातून प्रश्न समजून घेण्यास मदत होते.
- समाजातील निरनिराळ्या समस्यांबाबत कला आणि सांस्कृतिक माध्यमांमधून जनजागृतीचा प्रयत्न करतो.
- अभिव्यक्ती या महिल्यांच्या गटाद्वारे महिलांचे हक्क प्रस्थापित होण्यासाठी आणि महिलांच्या प्रश्नावर सामाजिक जागृती निर्माण करण्यासाठी कॉलेजेसमध्ये व वस्तीपातळीवर काम करतो.
- या सर्व प्रश्नांवर काम करताना आवश्यक विषयांवर आम्ही पत्रके व पुस्तकेही प्रकाशित करतो.

मित्रांनो आम्ही तुमच्यासारखेच सामान्य लोक आहोत. तुमच्यापैकी अनेकांना आम्ही परिचित नाही. तरीही आम्ही व्यक्त केलेल्या विचाराशी आपण सहमत व्हाल असा आम्हाला विश्वास वाटतो. पण नुसतेच सहमत नाही, तर आमच्या विविध उपक्रमांमध्ये आपला सहभागही आवश्यक आहे. त्यासाठी खाली दिलेल्या पत्त्यांवर तुम्ही आम्हाला नक्की संपर्क करू शकता.

**संपर्क पत्ता**
लोकायत, सिंडीकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, पुणे-४. (दर रविवारी सायं. ५ ते ७ या वेळेत मिटींग होते.)

**संपर्क फोन**

| | |
|---|---|
| अभिजित अ.मी. | ९४२२३ ०८१२५ |
| ऋषिकेश येवलेकर | ९४२३५ ०७८६४ |
| अलका जोशी | ९४२२३ १९१२९ |
| **Website** | www.lokayat.org.in |
| **Email** | lokayat.india@gmail.com |